




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन — निडर निर्भिड — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784








वर्ष ३ रे | अंक : १६९ वा सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# नीतिमूल्य समितीला मुहूर्त मिळेना!

## आमदारांबाबत घोषणा करुन महिना उलटूनही बैठकच नाही

**वृत्तसंस्था/मुंबई**

विधानभवनाच्या प्रवेशद्वारात आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली हाणामारी, सभागृहातील आमदारांमधील हमरीतुमरीच्या घटनांमुळे लोकप्रतिनिधींचे सभागृहातील वर्तन सुधारण्यासाठी ससंदेच्या धर्तीवर राज्य विधिमंडळाच्या सदस्यांसाठी नीतीमूल्य समितीची स्थापना करण्याची घोषणा नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात करण्यात आली. मात्र, महिना उलटला तरी अद्याप या समितीच्या नेमणुकीसाठी एकही बैठक झालेली नसल्याची माहिती विधिमंडळातील सूत्रांनी दिली. राज्य विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधिमंडळाच्या प्रवेशद्वारात हाणामारी झाली होती. त्याचे पडसाद अधिवेशनात उमटले होते. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात नाराजी व्यक्त केली होती. त्यातच गेल्या काही अधिवेशनांमध्ये होणारी गर्दी, विधिमंडळातील सदस्यांची सभागृहातील वर्तणूक या सर्व गोष्टी लक्षात घेता विधानसभेत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, तर विधान परिषदेत सभापती राम शिंदे यांनी आमदारांसाठी नितीमूल्य समितीची स्थापना करण्याची घोषणा केली होती. आमदारांच्या नैतिक आचरणाचे उच्च मापदंड राखण्यासाठी समिती स्थापन करण्यात करण्याचे विचाराधीन असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले होते. याबाबत सभापती व गटनेत्यांशी संपर्क साधून या विषयाचा निर्णय पुढच्या एक आठवड्यात घेण्यात येईल. संसदेत अशा प्रकारची नितीमूल्य समिती आहे. या समितीद्वारे सदस्यांचे केवळ निलंबन नाही, तर सदस्यत्वही रद्द करण्याची भूमिका संसदेत घेण्यात येते, याकडे विधानसभेत लक्ष वेधण्यात आले होते. मात्र




पावसाळी अधिवेशन संपून जवळपास महिना उलटला तरी याबाबत अंतिम निर्णय झालेला नसल्याची माहिती यानिमित्ताने समोर आली आहे. यासंदर्भात राज्य विधिमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो होऊ शकला नाही. समिती निश्चितीसाठी होणारा विलंब लक्षात घेता याबाबत सरकार उदासीन असल्याची टीका विरोधकांकडून केली जात आहे. त्यामुळे विधान भवनात येणारे लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या समर्थकांना शिस्तीचे धडे मिळणार की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे

# जलसमाधी घेणाऱ्या आंदोलकाच्या मृत्यूला प्रशासन जबाबदार!

## शिवसेना तालुका प्रमुख संतोष दांडगे आक्रमक!

**जनसंचलन/बुलढाणा**

केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षाने एका शेतकऱ्याचा बळी गेला.मात्र अजूनही प्रशासनाला याचे सोयरे -सुतक दिसून येत नाही.परिणामी या प्रश्नावर शिवसेना तालुका प्रमुख संतोष दांडगे आक्रमक झाले आहेत. १५ ऑगस्ट रोजी आडोळ खुर्द तालुका जळगाव जामोद येथील ग्रामस्थांचे जलसमाधी आंदोलन सुरू होते,यामधे विनोद पवार या तरुण आंदोलकांचा प्रशासनाच्या हलगर्जी पणामुळे नाहक बळी गेला, या घटनेला उपविभागीय महसूल अधिकारी शैलेश काळे जळगाव जामोद आणि पोलिस निरीक्षक श्रीकांत निचळ जळगाव जामोद हे जबाबदार आहेत. या आंदोलनाची पूर्व सूचना आंदोलकांनी एक महिना आधीच प्रशासनाला दिली होती. परंतु प्रशासनाने यामधे कुठलीही दखल घेतली नाही त्यामुळेच ही घटना घडली.

जर एखादे वेळी एखाद्या मंत्र्याच्या घरावर आंदोलन करायला गेल्यावर १,२ किलोमीटर अगोदर आंदोलन स्थानबद्ध करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून होतो. तर मग हे संपूर्ण गावाचे त्यातही लहान मुले व स्त्रिया यांचा समावेश असलेले जलसमाधी आंदोलन होते. तर मग येथे अशीच खबरदारी का नाही घेतली? यावेळी चे जवान आधीच पाण्यामध्ये का नाही ठेवले? पूर्णा नदीच्या पात्रापासून काही अंतरावर बॅरिगेटिंग करणे आवश्यक होते. हे का नाही बसविले? पोलिस प्रशासन घटनास्थळी



कश्यासाठी होते? आंदोलन आहे हे आधीच माहिती असताना प्रशासनाचे मौन का? या सर्व घटनेला जबाबदार अधिकारी यांच्यावर योग्य ती शासकीय कार्यवाही करावी, असे न झाल्यास तालुका शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल,असा इशारा देण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रघुजी भोसले यांच्या तलवारप्राप्तीची यशोगाथा...

## संपादकीय लेख

महाराष्ट्राच्या नव्हे तर संपूर्ण देशाच्या इतिहासात ११ ऑगस्ट २०२५. हा दिवससुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा होता. महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या पुढाकारातून व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयास तलवार परत आणण्याची ऐतिहासिक कामगिरी पार पाडता आली. २९ एप्रिल २०२५ रोजी लंडनच्या म लिलाव गृहामध्ये भोसले घराण्याच्या नागपूरकर शाखेमधील रघुजी राजे भोसले (प्रथम) यांची तलवार विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे, असे समजताच महाराष्ट्रात त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. त्याची तातडीने दाखल घेऊन सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी विशेष व्यवस्था करून लंडनमधे या जाहीर लिलावात मध्यस्थाच्या माध्यमातून भाग घेतला आणि ही ऐतिहासिक तलवार ४७ लाख रुपयांना महाराष्ट्र शासनासाठी विकत घेतली. यासाठी विकास खारगे, अपर मुख्य सचिव व किरण कुलकर्णी, सचिव सांस्कृतिक कार्य यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. आपल्या देशाच्या इतिहासांत हे पहिल्यांदाच घडत होतं. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी यांनी ११ ऑगस्ट २०२५ लंडनला जाऊन ही तलवार प्रत्यक्ष ताब्यात घेतली. ही भारतात आणण्यासाठी आठ कौन्सिल ऑफ इंग्लंड आणि ब्रिटनच्या कस्टम्स विभागाचा परवाना मिळवणे हे अवघड काम पुरातत्त्व संचालनालयाने कोणताही अनुभव पाठीशी नसताना यशस्वीरित्या पार पाडले. ही भारतात आल्यावरही भारतीय कस्टम विभाग आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांनीही अतिशय तत्परतेने आवश्यक सहकार्य प्रदान केले. ही तलवार लोकार्पित करण्याचा सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवार, १८ ऑगस्टला सायंकाळी ६ वाजता मुंबईत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे संपन्न होत आहे. रघुजी भोसले प्रथम (१६९५ ते १४ फेब्रुवारी १७५५) हे नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार होते. रघुजी भोसले यांचे शौर्य आणि युद्धनीती यांवर प्रसन्न होऊन छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना ङ्गसेनासाहिबसुभाफही पदवी दिली होती. रघुजी भोसले प्रथम यांनी १७४५ आणि १७५५ मध्ये बंगालच्या नवाबाविरुद्ध युद्धमोहिमांचे नेतृत्व करून मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला. याचबरोबर रघुजींनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये चांदा, छत्तीसगढ, संबळपूर याही प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. दक्षिण भारतातील कुड्डाप्पाचा नवाब, कर्नूलचा नवाब यांचाही पराभव करून दक्षिण भारतात आपला लष्करी आणि राजकीय दबदबा निर्माण केला. अठराव्या शतकातील एक अत्यंत धाडसी मराठा सेनानी म्हणून रघुजी भोसलेंकडे बघितले जाते. रघुजीराजे भोसले यांची लंडनवरून परत आणलेली तलवार ही ङ्गफिरंगीफ प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण तलवार आहे. चार फूट लांबी असलेली ही तलवार सरळ पात्याची, एकधारी आहे. तलवारीचे पाते विदेशी बनावटीचे असून मूठ ङ्गमुल्हेरीफ घाटाची, स्थानिक पातळीवर लोखंडाची बनवलेली आहे. तलवारीच्या पात्यावर , तसेच काही इतर इंग्रजी अक्षरे कोरलेली आहेत. पात्याच्या मध्यभागी दोन लांब नाळसुद्धा कोरलेल्या आहेत. या तलवारीच्या मुठीच्या संपूर्ण पृष्ठभागावर ङ्गकोफ्तगरीफ प्रकारचे सोन्याचे नक्षीकाम केलेले आहे. या नक्षीकामामध्ये सोन्याच्या पाण्याने वेलबुट्टी. कोयऱ्या यांची नक्षी काढलेली आहे. मुठीच्या नख्या आणि परजेवर तलवार अडकवण्याची दोरी ओवण्यासाठी लहान छिद्रेसुद्धा बनवलेली आहेत. तलवारीवरील ज्या गोष्टीमुळे ही तलवार रघुजी भोसले यांची असल्याचे खात्रीशीरपणे सांगता येते, ते म्हणजे तलवारीच्या पाठीवर लिहिलेला लेख. या तलवारीच्या पात्याच्या तळाशी पाठीवर ङ्गश्रीमंत रघोजी भोसले सेनासाहबसुभा फिरंग मकर जनब गंगाफ हा लेख सोन्याच्या पाण्याने लिहिलेला आहे. यातील ङ्गश्रीमंत रघोजी भोसलेफ हे रघुजी भोसले यांचे नाव तर ङ्गसेना साहब सुभाफ हा रघुजींना छत्रपती शाहू महाराज (सातारा गादी) यांच्याकडून १७३० मध्ये मिळालेले पद आहे. त्यामुळे ही तलवार इसवी सन १७३० नंतर बनवली गेल्याचे सांगता येते. ङ्गफिरंगफम्हणजे तलवार. लेखाच्या पुढील भागात ङ्गमकर जनब गंगाफ ही अक्षरे आहेत. मकर म्हणजे मगर, गंगा अर्थात गंगा नदी. ङ्गजनबफ हा शब्द ङ्गजनुबफ़ फारसी शब्दाचे अपभ्रंशित रूप असण्याची शक्यता आहे ज्याचा अर्थ ङ्गशेपटीफ असा



होतो. मगर हे हिंदू पौराणिक धारणांमध्ये गंगा नदीचे वाहन मानलेले आहे. ङ्गजनबफ शब्दाचा अर्थ शेपटी असा घेतल्यास ङ्गफिरंग मकर जनब गंगाफ याचा साधारण अर्थ ङ्गगंगेचे वाहन असणाऱ्या मगरीच्या शेपटीप्रमाणे असणारी तलवारफ असा होऊ शकतो. शेपटी हे मगरीचे बलस्थान मानले जाते. मगरीची शेपटी तिला पाण्याच्या प्रवाहाविरूद्ध पोहण्यासाठी तसेच शिकार करताना वेगाने हालचाली करण्यासाठी सहाय्य करते. त्यानुसार या तलवारीला मगरीच्या बलशाली शेपटीची उपमा दिलेली असू शकते. ङ्गजनबफ याचा दुसरा अर्थ जिथे तलवारी तयार होतात ती जागा असाही होतो. लेखामधील ङ्गजनबफ शब्द जोनुब किंवा जनब या फारसी शब्दाचा अपभ्रंश म्हणून धरल्यास ङ्गगंगेच्या जवळीलफ असाही अर्थ होवू शकतो. या सर्व तर्कांमध्ये ङ्गगंगाफनदीचा संदर्भ समान आहे. १७४० च्या दशकात मराठा सैन्याने रघुजी भोसले यांच्या नेतृत्वाखाली बंगाल प्रांतामध्ये मोहिमा केला. या मोहिमांमध्ये पहिल्यांदाच मराठा साम्राज्याचा विस्तार बंगालच्या गंगा नदीपर्यंत झाला. रघुजी भोसले यांनी बंगाल प्रांती गंगा नदीपर्यंत मिळवलेल्या विजयाची आठवण म्हणून किंवा त्यानंतर (१७४० नंतर) ही तलवार बनवली गेली असण्याची शक्यता आहे.






## विश्वकर्मा सुतार समाज एकत्रीकरण समितीच्या वतीने समशेरसिंग पारधी आश्रम शाळेत अन्नदान



**जनसंचलन/बुलढाणा**

१५ ऑगस्ट २०२५स्वातंत्रदिनाचे औचित्य साधुन मा .आ. डॉ . संजय रायमुलकर यांच्या वाढदिवसा निमित्य मेहकर तालुक्यातील वरदडा येथे समशेरसिंग पारधी आश्रम शाळेत विश्वकर्मा सुतार समाज एकत्रीकरण समिती बुलडाणा जिल्हा वतीने आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना भोजन दिले व आश्रम शाळेला समाजाच्या वतीने विश्वकर्मा सुतार समाज एकत्रीकरण समिती बुलडाणा जिल्हा १५ ऑगस्ट २०२५ नाम लिखित पितळी घंटा संस्थेला संस्थेचे अध्यक्ष युवराज पवार यांचे कडे सुपुर्द करण्यात आला . या वेळी संस्थाध्यक्ष यांनी समाजाच्या या आदर्श कार्याचे कौतुक केले. या वेळी विश्वकर्मा सुतार समाज एकत्रीकरण समितिचे जिल्हाअध्यक्ष अनंत राऊत , जेष्ठ कार्यकर्ते गजानन सुरुशे , उपजिल्हाअध्यक्ष संजय राऊत सामाजिक कार्यकर्ते एकनाथ राऊत, आदिनाथ खोलगडे , विश्वकर्मा सुतार समाज एकत्रीकरण समितीचे मेहकर तालुका अध्यक्ष गणेश राऊत उपस्थित होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# काय म्हणतंय पावसाचं भाकीत?



पावसाचं प्रमाण सरासरीएवढं राहील, असं भाकीत करण्यात आल्यामुळे गेल्या वर्षी अवघा देश खुशीत होता. प्रत्यक्षात हा अंदाज फोल ठरला आणि पाणीवापराचं नियोजन चुकल्यानं अनेक राज्यांवर तीव्र दुष्काळी स्थितीला तोंड देण्याची वेळ आली. आता यंदा मान्सूनचं प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्या दृष्टीने लागोपाठच्या दुष्काळी स्थितीवर उपाययोजनांसाठी आतापासून पावलं टाकावी लागणार आहेत.

यंदाची तीव्र दुष्काळी स्थिती आणि त्यात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना करावी लागणारी भटकंती, चा-याअभावी होणारे जनावरांचे हाल, या पार्श्वभूमीवर सा-यांचं लक्ष आता मान्सूनच्या आगमनाकडे लागलं आहे. यंदा तरी पावसाचं आगमन वेळेत होईल आणि तो समाधानकारक राहील, असा आशावाद सारेजण मनाशी बाळगून आहेत. विशेषत: शेतकरीवर्गाला त्याची अधिक आस आहे. असं असताना नुकतेच समोर आलेले मान्सूनचे अंदाज मात्र चिंता वाढवणारे आहेत. ङ्मयंदा केरळमध्ये ४ जून रोजी मान्सून दाखल होण्याची चिन्हं असून, देशातल्या चारही प्रदेशांमध्ये तो सरासरीपेक्षा कमीच असेलफ, असा अंदाज ङ्कस्कायमेटफ या खासगी हवामान संस्थेनं वर्तवला आहे. देशातल्या पूर्व, वायव्य, मध्य आणि ईशान्य या चारही प्रदेशांमध्ये यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमी म्हणजे ९३ टक्के असेल आणि त्यात पूर्व आणि ईशान्येत मान्सूनचं प्रमाण वायव्य आणि दक्षिणेपेक्षा कमी राहील, असं स्कायमेटनं म्हटलं आहे. यावर्षी बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये पावसाचं प्रमाण अधिक राहील आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पावसाचं प्रमाण सर्वसाधारण राहण्याचा अंदाज आहे. मात्र, उत्तर भारतातील सर्व राज्यांमध्ये यंदा मान्सूनचं प्रमाण सरासरीपेक्षा कमी म्हणजे ९६ टक्के राहील, असं स्कायमेटचं म्हणणं आहे.

महाराष्ट्रात यंदा तीव्र दुष्काळी स्थिती असलेल्या भागात विदर्भ आणि मराठवाड्याचा समावेश होतो. अशा परिस्थितीत शेतकरी मान्सूनकडे मोठ्या आशेने डोळे लावून बसला असताना, यंदाही या प्रदेशात सरासरीच्या ९१ टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम मध्य प्रदेश आणि गुजरात या मध्य भारतात मोडणा-या भागात यंदा मान्सून सरासरीच्या ९१ टक्के राहील, असं सांगितलं जात आहे. ही शेतक-यांसाठी चिंता वाढवणारी बाब आहे. अगोदरच यंदाचा दुष्काळ १९७२ मधल्या दुष्काळाइतकाच तीव्र स्वरूपाचा असल्याचं शरद पवार यांच्यासारख्या नेत्यांचं म्हणणं आहे. त्यातच यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्यास उद्भवणारा दुष्काळ आणखी तीव्र असेल, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. अर्थात, आपल्याकडची मान्सूनबाबतची भाकितं कितपत खरी ठरतात, हा प्रश्नच आहे.

मात्र, सरकारी हवामान खात्याकडून वर्तवण्यात आलेल्या मान्सूनच्या अंदाजाच्या अचूकतेपेक्षा खासगी संस्थांच्या हवमान अंदाजाची अचूकता अधिक असते, असं साधारण चित्र पाहायला मिळतं. त्यातही परदेशी तज्ज्ञांचं भाकीत जास्त विश्वासार्ह ठरतं. मात्र, त्यावर फारसा विश्वास दाखवला जात नाही. या अंदाजांकडे केलेलं दुर्लक्ष महागात पडतं. कमी पावसामुळे दुष्काळी स्थिती निर्माण होऊन शेतातल्या पिकांचं नुकसान होतं. परिणामी, शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. चाराटंचाईमुळे जनावरांचेही हाल होतात. यातून दिलासा मिळवण्यासाठी शेतकरीवर्ग सरकारकडे मोठ्या आशेनं पाहत असतो. मात्र, दुष्काळी स्थितीवर सरकारकडे रामबाण उपाय नसल्यामुळे जनतेची अवस्था ङ्मभरवशाच्या म्हशीला टोणगाफ अशी होते.


वास्तविक, शास्त्रीयदृष्ट्या पावसाचं भाकीत कळण्याचे १६-१७ आडाखे जागतिक हवामान तज्ज्ञांनी निश्चित केले आहेत. त्यामध्ये पावसाचे अंदाज अचूक ठरण्यासाठी प्रत्येक दहा-वीस किलोमीटरच्या त्रिज्येमध्ये किंवा व्यासामध्ये एक हवामान केंद्र स्थापन करावं, असं सांगण्यात आलं आहे. तरच हवामानाचा अंदाज अचूक पद्धतीने वर्तवता येतो; परंतु आपल्या देशात वर्तवले जाणारे हवामानाचे अदांज ठरावीक हवामान केंद्रांमधल्या माहितीवर तसंच निष्कर्षावरच आधारित असतात. त्यामुळे त्या त्या वर्षी मान्सूनबाबत विदर्भात काय होणार, मराठवाड्यात काय होणार, खानदेश, पश्चिम महाराष्ट्रात स्थिती कशी राहणार, याचे अचूक अंदाज आपल्या हवामान खात्याला बांधता येत नाहीत. मुख्यत्वे हवामान खात्यातल्या तज्ज्ञांना हवामान अंदाजाबाबतचं शास्त्र आणि तत्त्व माहीत आहे; परंतु अत्याधुनिक सामग्री, यंत्रणा, आवश्यक त्या प्रमाणात तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध नसणं आणि वर सांगितल्याप्रमाणे ठरावीक अंतरावर हवामान केंद्र स्थापित करण्यासाठी गुंतवणूक करण्याकडे राज्य तसंच केंद्र सरकारचं अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

अलीकडच्या काळात जागतिकीकरणामुळे अवघं जग जवळ येत असताना, दारिद्र्य, बेकारी या समस्यांचं वाढतं प्रमाणही विचारात घेण्याजोगं आहे. अशा परिस्थितीत गरीब आणि लहान देशांना मान्सूनच्या अचूक अंदाजासाठी यंत्रणा उभारण्याच्या दृष्टीने मोठी गुंतवणूक करणं शक्य होत नाही. असं असताना या देशात हवामानाचे अचूक हवामानाचे अंदाज कसे वर्तवले जातात, ही विचारात घेण्याजोगी आणि अभ्यास करण्याजोगी बाब आहे. सर्वसाधारणपणे अशा देशांमध्ये अत्युच्च दर्जाच्या हवामान शास्त्रज्ञांच्या एका स्वतंत्र विभागाची निर्मिती केली जाते. या विभागातले शास्त्रज्ञ परदेशातल्या शास्त्रज्ञांशी संपर्क साधून, त्यांच्याशी वेळोवेळी चर्चा करून, त्यांना आवश्यक ती माहिती देऊन आपल्या देशातल्या विभाग वा भागानुसार मान्सूनची स्थिती काय राहील, याचे अंदाज वर्तवत असतात आणि ते अचूक ठरतात; परंतु हे शास्त्रज्ञ आपल्या देशातल्या मान्सूनबद्दल अंदाज व्यक्त करून थांबत नाहीत, तर त्या अंदाजानुसार निर्माण होणा-या परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारला काही तातडीच्या उपाययोजना सुचवतात. त्याचबरोबर संभाव्य स्थितीबाबत शेतकरीवर्गाला सावध केलं जातं. सरकारला सुचवलेल्या उपाययोजनांच्या तातडीच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले जातात. त्या दृष्टीने सर्व यंत्रणा कामाला लागतात आणि मान्सूनचं प्रमाण कमी-जास्त राहिलं तरी निर्माण होणा-या परिस्थितीवर मात करणं शक्य होतं.

या संदर्भात आपल्याकडील एक उदाहरण लक्षात घेण्यासारखं आहे. मान्सूनच्या अंदाजात अधिक अचूकता आणणं किती महत्त्वाचं आहे, याची जाणीव तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांना झाली होती. त्यामुळे त्यांनी देशातल्या शास्त्रज्ञांना या संदर्भात संशोधनाचं आवाहन केलं होतं. त्यानुसार ज्येष्ठ शास्त्रज्ञ वसंतराव गोवारीकर यांनी राजीव गांधी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पावसाचा अचूक अंदाज वर्तवणारं एक मॉडेल विकसित केलं होतं; परंतु राजीव गांधी यांच्यानंतर एकाही जाणकार नेत्याने या अत्यंत महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष दिलं नाही. त्यातूनच आताची स्थिती उद्भवली आहे. या विवेचनावरून हे लक्षात येतं की, हवामानशास्त्र हे परिपूर्ण आणि भरवशाचं शास्त्र आहे. ते भविष्यकथनासारखं अंदाज वतवण्याचं शास्त्र नाही. मात्र, आपल्या देशात सरकारी हवामान खात्याच्या अंदाजाला महत्त्व न देता खासगी संस्था आणि व्यक्तींच्या अंदाजावर लोक भरवसा ठेवतात. काही वेळा हे अंदाज खरेही ठरतात. कारण, इस्रयल या लहान देशाप्रमाणे काही देश आर्थिक कुवत नसल्यामुळे जगातल्या प्रगत हवामानतज्ज्ञांशी आणि प्रयोगशाळांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करून आपल्या देशातल्या पावसाचा अंदाज जाणून घेतात. अशा स्थितीत लवकरच केंद्रात अस्तित्वात येणा-या सरकारने हवामानाच्या अचूक अंदाजाला प्राधान्य देऊन त्यासाठी परदेशातून अचूक निदान करणारी यंत्रयासामग्री आणून हवामानाचा डेटा तयार करणारी यंत्रणा निर्माण करण्यावर भर द्यायला हवा. तरच शेतक-यांची या विवंचनेतून सुटका होऊ शकेल.


# रेल्वे प्रवासात बिहारी पदार्थांचा स्वाद घेता येणार





बिहारकडे जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांना आता खास स्थानिक पदार्थांचा आस्वाद घेता येईल. या पदार्थांच्या मेन्यूमध्ये बदल करण्याची परवानगी ङ्मइंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनफ्ला (आयआरसीटीसी) देण्यात आली आहे.पूर्व-मध्य रेल्वेच्या गाड्यांमध्ये आता लिट्टी-चोखा, चूडा-दही, मखाण्याची खीर आणि घुगनीसारखे खास स्थानिक बिहारी पदार्थ मिळतील.स्थानिक पदार्थांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय करण्यात आला असून, बिहारमधून निघणाऱ्या लांब पल्ल्यांच्या गाड्यांमध्ये ही सुविधा मिळेल. रेल्वेगाडी ज्या स्थानकापासून प्रवासाला प्रारंभ करेल, तेथील स्थानिक पदार्थ या मेन्यूमध्ये असतील. दक्षिण भारतात धावणाऱ्या गाड्यांमध्ये इडली-डोसा यासारखे स्थानिक पदार्थ मिळतात, तसेच पश्चिम भारतातून प्रवास करणाऱ्या गाड्यांमध्येही स्थानिक पदार्थ मिळतात. बिहारमध्येही आता ते मिळायला लागतील. आयआरसीटीसीच्या योजनेनुसार, बिहारमधून प्रवास सुरू करणाऱ्या रेल्वे गाड्यांतील प्रवाशांना सकाळच्या नाश्त्यासाठी लिट्टी-चोखा, चूडा-दही, घुगनी आणि मखाण्याची खीर हे पदार्थ दिले जातील. दह्याच्या पुरवठ्यासाठी सुधा डेअरीबरोबर लवकरच करार केला जाणार आहे. दुपार व रात्रीच्या जेवणांत ज्वारी, बाजरी, कोदो, रागी आदी धान्यांचे पदार्थ दिले जातील.मांसाहारी प्रवाशांसाठी गावरान कोंबडीचा पर्याय असेल. शनिवारी खिचडी-दही-पापड मिळेल.

# मागोवा कृष्णविवराचा



कृष्णविवरं हा तसा कुतूहलाचा आणि संशोधनाचा विषय. अनेक अंतराळ संशोधकांनी त्याबाबत बरीच भाष्यं केली आहेत. ज्येष्ठ संशोधक स्टीफन हॉकिंग्जनी या संदर्भात विलक्षण असं काम केलं; परंतु काही संशोधकांनी मुळातच कृष्णविवरं असतात का, अशी शंका व्यक्त केली होती. आता या प्रश्नाला ठाम उत्तर मिळालं आहे. संशोधकांनी कृष्णविवराचं छायाचित्र मिळवलं आहे.

पृथ्वीपासून सुमारे २६ हजार प्रकाशवर्ष दूर असलेल्या कृष्णविवराचं पहिलं-वहिलं छायाचित्र खगोलशास्त्रज्ञांनी मिळवलं आहे. अंतराळशास्त्रातला ऐतिहासिक प्रसंग असं या घटनेचं वर्णन केलं जात आहे. यामुळे पृथ्वीची उत्पत्ती कशी झाली यावर चांगलाच प्रकाश पडू शकेल, असं संशोधकांचं मत आहे. अमेरिकेतले खगोलशास्त्रज्ञ आणि ङ्कइव्हेंट होरायझन टेलिस्कोपफ या मोहिमेचे संचालक शेफर्ड डोलेमन यांनी यात मोठी कामगिरी बजावली. खगोलशास्त्रज्ञांच्या गटानं अलीकडे एकाच वेळी वॉशिंग्टन, सँटियागो आणि तैपेई इथे पत्रकार परिषदा घेऊन हे छायाचित्र प्रसिद्ध केलं. या मोहिमेअंतर्गत संशोधकांनी हवाई, स्पेन, ॲरिझोना, मेक्सिको, चिली आणि दक्षिण ध्रुव या सहा ठिकाणी इव्हेंट होरायझन दुर्बिणि बसवल्या होत्या. त्यांच्या सहाय्यानं ही छायाचित्रं घेण्यात आली. जगभरातले २०० संशोधक या मोहिमेत सहभागी झाले होते.

अत्यंत छोटा आकार; परंतु प्रचंड वस्तुमान असलेली खगोलीय वस्तू असं कृष्णविवराचं थोडक्यात वर्णन करता येतं. पूर्व आशिया वेधशाळेचे संचालक टी. पी. पॉल यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कृष्णविवराच्या छायाचित्रासाठी वैज्ञानिक प्रतिमा विकसित करण्याच्या सातत्यपूर्ण पद्धती वापरण्यात आल्या. त्यानंतर मध्यभागी कृष्णविवराची छाया असलेली आणि त्याभोवती प्रकाशमान रचना असलेली कडीसदृश प्रतिमा सापडली. त्याच्याभोवती गुरुत्वाकर्षण शक्तीचं अभेद्य आवरण असल्याचंही स्पष्ट झालं आहे. वायू आणि धुळीच्या गडद काळ्या रंगाच्या भुयाराभोवती किंवा कृष्णविवराभोवती केशरी रंगाच्या वायूचं प्रभामंडळही दिसत असून हे कृष्णविवर साडेपाच कोटी प्रकाशवर्ष दूर असलेल्या एम(मेस्सिअर)-८७ या नावानं ओळखल्या जाणा-या आकाशगंगेत आहे. या कृष्णविवराचं छायाचित्र घेण्यासाठी २०१७ मध्ये ङ्कइव्हेंट होरायझन टेलिस्कोपफं आवश्यक माहिती गोळा केली होती. या दुर्बिणींच्या जाळ्यात जगभरातल्या आठ रेडिओ दुर्बिणींचा समावेश होता.

कृष्णविवरं म्हणजे काय आणि ती कशी तयार होतात याविषयी काही सिद्धांत मांडले गेले आहेत. त्यानुसार एका विशिष्ट वस्तुमानापेक्षा अधिक वस्तुमानाचे तारे त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात आक्रसत जातात आणि त्यांचं रूपांतर कृष्णविवरांमध्ये होतं. तिथे प्रचंड म्हणावं एवढं गुरुत्वाकर्षण असतं. अवकाशातल्या तारे, उल्कांसह कोणतेही पदार्थ आणि अगदी प्रकाशकिरणही त्याच्या बलापासून वाचू शकत नाहीत आणि त्यात गडप होतात. कृष्णविवरं ही रहस्यमय आणि त्याच वेळी रंजकही मानली जातात.

आजपर्यंत त्यांच्याविषयीचे निव्वळ अंदाज व्यक्त होत होते; परंतु या छायाचित्रानं त्यांच्या अस्तित्वाला बळकटी प्राप्त झाली आहे आणि ता-याचं अखेरीस काय होतं याचं ब-यापैकी उत्तरही मिळालं आहे. सूर्याहून शेकडो पटींनी मोठे असलेले तारे मरण पावले की त्यांच्यातल्या हायड्रोजनच्या संयोगाची प्रक्रिया बंद पडते आणि गुरुत्वाकर्षणाच्या प्रचंड दबावामुळे अशा ता-याचं कृष्णविवरात रूपांतर होतं, असं संशोधकांचं म्हणणं आहे. सर्व आकाशगंगा अशा महाकाय कृष्णविवरांभोवती फिरत असतात. विश्वनिर्मितीच्या वेळी झालेल्या महाविस्फोटातून म्हणजेच ङ्कबिग बँगफमधून अनेक कृष्णविवरांची निर्मिती झाल्याचं मानलं जातं.

कृष्णविवरांविषयीचा विचार प्रामुख्यानं अठराव्या शतकापासूनच सुरू झाला होता. अठराव्या शतकात जॉन मायकेल आणि पिअरी सायमन लाप्लेस यांनी प्रकाशलहरींसारखे शक्तिशाली विद्युत चुंबकीय कणही ज्या क्षेत्रांमधून बाहेर पडू शकत नाहीत, अशा गुरुत्वीय क्षेत्रांचा विचार केला. सर्वसामान्य सापेक्षतेचं कोडं सोडवताना कार्ल श्वार्झचाईल्डनं १९१६ मध्ये पहिल्यांदा कृष्णविवराची आधुनिक संकल्पना मांडली. मात्र १९५८ मध्ये ही संकल्पना अधिक स्पष्ट करून ज्या प्रदेशातून कोणतीही गोष्ट सुटून बाहेर पडू शकत नाही, अशी कृष्णविवराची कल्पना डेव्हिड फिकल्स्टीन याने स्पष्ट केली. १९६७ मध्ये जॅकलिन बेल बन्रेलनं न्यूट्रॉन ता-यांचा शोध लावल्यावर ङ्कगुरुत्वशक्ती असलेल्या; परंतु मूळ स्वरूप नष्ट झालेल्या घट्ट, आटोपशीर वस्तू या खगोलभौतिकीय वास्तविकताफ असू शकतात, असं मत मांडलं जाऊ लागलं आणि कृष्णविवरांविषयीच्या संशोधनाला अधिक चालना मिळाली. विसाव्या शतकात याला ङ्ककृष्ण ताराफ असं म्हटलं गेलं होतं; परंतु कृष्णविवर हे नावच अनेकांना योग्य वाटलं.

स्टीफन हॉकिंग्ज यांनी कृष्णविवरांच्या शास्त्रीय संशोधनात मोलाची भर टाकली. स्वत:भोवती फिरणा-या कृष्णविवराचा आकार, नष्ट झालेल्या ज्या खगोलीय वस्तूपासून ते बनलेलं असतं तिच्यावर नव्हे; तर त्या कृष्णविवराच्या वस्तुमानावर आणि फिरण्याच्या गतीवर अवलंबून असतो, असं त्यांनी दाखवून दिलं. शिवाय कृष्णविवराविषयीचे चार नियमही त्यांनी मांडले. कृष्णविवरांमधली सगळी ऊर्जा बाहेर पडून त्यांचं संपूर्ण बाष्पीभवन होईपर्यंत कृष्णविवरं औष्णिकदृष्ट्या अणूचे उपकण तयार करून त्यांचं उत्सर्जन करत राहतात, असं त्यांनी स्पष्ट केलं. यालाच हॉकिंग्ज उत्सर्जन असं म्हटलं जातं. या सिद्धांतानुसार कृष्णविवरं पूर्णपणे काळी नसतात आणि ती कायमस्वरूपी टिकतही नाही. हॉकिंग्ज यांच्या कृष्णविवरांविषयीच्या सिद्धांतांमुळे या संशोधनाला आणखी वेगळी दिशा मिळाली होती. कृष्णविवरांविषयी काही मतमतांतरं असली तरी तयार झालेली कृष्णविवरं पहिल्यांदा आजूबाजूच्या गोष्टी गिळंकृत करतात. यामध्ये शेजारच्या ता-यांचाही समावेश असतो. त्यांचा आकार वाढत जातो. काही वेळा ती इतर कृष्णविवरांमध्येही विलीन होतात आणि अधिकाधिक मोठी बनत जातात. अनेक आकाशगंगांच्या केंद्रस्थानी कोटय़वधी सूर्य पोटात असलेली कृष्णविवरं असतात, या गोष्टींवर संशोधकांचं एकमत आहे.

# औषधी दुधी भोपळा



दुधी भोपळा म्हटले म्हणजे अनेक जण नाके मुरडतात. मात्र, तो किती गुणकारी आहे, याबद्दल तुम्हाला कदाचित माहीत नसावे. दुधी भोपळा औषधी भाजी असून, त्यात लोह, कॅल्शियम, फॉस्फरस व अन्य खनिजे आहेत. तंतुमय, रेषादार तसेच जीवनसत्त्व ङ्ककफ असलेली फळभाजी दुर्लक्षित आहे. मात्र, आता हळूहळू त्यांचे महत्त्व नागरिकांना पटत असल्याने ते खाण्याचे प्रमाण वाढले आहे. हृदयविकाराच्या रुग्णांना दुधी भोपळ्याचा रस सकाळ-संध्याकाळ एक-एक वाटी दिल्यास, रोहिण्यांमधील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. दुधी भोपळ्याचा रस एक वाटी, लिंबाचा रस एक चमचा व एक चमचा मध एकत्र करून दिल्यास मूत्रविकार कमी होतात. रोज सकाळी काही न खाण्याआधी अर्धा वाटी दुधी भोपळ्याचा रस व एक चमचा आल्याचा रस पाण्यात मिसळून घेतल्यास, स्थूलपणा कमी होतो. दुधी भोपळ्याच्या एक वाटी रसात एक चमचा मध व चिमूटभर जायफळ पूड मिसळून तयार झालेला तेप त्वचेवर लावल्यास कांती उजळते. एक चमचा आवळा चूर्ण भोपळ्याच्या रसात रात्री कोमट पाण्यात घेतल्याने झोप चांगली लागते. तसेच पोट साफ होते. दुधी भोपळ्याचा एक वाटी रस, एक चमचा ओवा, चिमूटभर काळे मीठ घालून गरम करून ते चाखल्याने पोटाचा फुगीरपणा कमी होतो. दुधी भोपळ्याचा रस आटवून त्यात एक मिरे व पिंगळी वाटून त्यात एक चमचा मध मिसळून त्याचे चाटण लहान मुलांना दिल्यास, छातीतील कफ दूर होतो.

**दुधी भोपळ्याचा पराठा** साहित्य ३०० ग्रॅम दुधी भोपळा, ३ वाटय़ा कणीक, १ चमचा तिखट, १/२ चमचा हळद, १ चमचा मीठ, २ चमचे धणे-जीरे पूड, १ चमचा गरम मसाला, ४ चमचे डालडय़ाचे मोहन. कृती भोपळा किसून घ्यावा. पाणी पिळून बाजूला काढून ठेवावा. नंतर सर्व एकत्र करून पीठ भिजवावे. पीठ घट्ट असावे. जरूर वाटल्यास भोपळ्याचेच काढलेले पाणी वापरावे. नंतर त्याचे फुलक्याएवढे पराठे करून दोन्ही बाजूने शेकावेत व नंतर बाजूने तूप सोडावे.

**दुधी भोपळ्याचे सूप** दुधी भोपळा ही एक सर्वत्र मिळणारी वेलवर्गीय भाजी आहे. पण, सहसा कोणाला आवडत नाही. याला पथ्यकर भाजी म्हणून संबोधतात; परंतु आजारपणातून उठलेल्या व्यक्तीला रोज द्यावी. अशक्तपणा लवकर भरून येतो. तसेच हृदयरोग्यांना सुद्धा खूपच उपयुक्त आहे. याचा रस रक्त पातळ ठेवते. दुधीमधे ९६ टक्के पाणी असते. वजन घटवण्यासाठी पण उपयुक्त आहे. कमी तेलात होते. याचे विविध प्रकार करून आहारात वापरू शकतो. जसे की, भाजी, पराठे, कोफ्ते, हलवा, सालीची चटणी, नुसते फोडी वाफवून सलाड इत्यादी. काहीही करून जास्तीत-जास्त आहारात वापरावा.

# दुष्काळाचा मुक्काम वाढणार..



गेल्या वर्षी देशात ९७ टक्के पावसाचं भाकीत चुकीचं ठरलं. मात्र, काही भागांमध्ये समाधानकारक पाऊस होऊनही तीव्र दुष्काळी स्थितीचं संकट उभं ठाकलं. या पार्श्वभूमीवर यंदाही देशात दुष्काळी स्थिती कायम राहण्याचे संकेत परदेशी तज्ज्ञ तसेच अभ्यासकांनी दिले असून त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. केंद्रात लवकरच सत्तारूढ होणा-या नव्या सरकारला दुष्काळ निवारण कार्यात काही नव्या उपायांवर भर द्यावा लागणार आहे.

मे महिन्यात तापमानात मोठी वाढ होत असताना आणि असह्य उष्णतेने सारेजण हैराण होत असताना यंदाचा मान्सून कसा राहील, याविषयीही उत्सुकता होती. सर्वसाधारणपणे या महिन्यात पावसाचे अंदाज वर्तवले जातात. आजकाल हवामान खात्याबरोबरच खासगी संस्थांकडूनही पाऊसपाणी कसं राहील, याविषयी अंदाज वर्तवले जाऊ लागले आहेत. सद्यस्थितीत देशाच्या काही भागातलं भीषण दुष्काळाचं चित्र लक्षात घेता यंदाचा मान्सून कसा राहणार, याविषयी जाणून घेण्याची उत्सुकता वाढीस लागली आहे. याचं महत्त्वाचं कारण पाऊस कमी पडला की, दुष्काळी स्थितीला हमखास तोंड द्यावं लागणार, असं जणू समीकरण तयार झालं आहे. त्या दृष्टीने विचार करायचा तर सरासरीएवढा पाऊस पडूनही दुष्काळी स्थिती निर्माण होताना पाहायला मिळते. अशा स्थितीत सारा दोष निसर्गाला कसा देणार, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. त्यातच जागतिक तापमानवाढीचं संकट वरेचवर तीव्र होत चाललं आहे. हवामानबदलामुळे पावसाचं वेळापत्रकही बदलू लागलं आहे. मुख्यत्वे येत्या काळात हे चित्र आणखी चिंताजनक बनणार असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. त्यामुळे आता दरवर्षी पाऊस नियोजित वेळेत किंवा काही दिवस पुढे-मागे येईल आणि तो सरासरीएवढा किंवा त्यापेक्षा कमी-अधिक होईल, असा विश्वास बाळगणं चुकीचं ठरणार आहे. खरं तर या देशाला दुष्काळाचं संकट तसं नवीन नाही. यापूर्वी याहीपेक्षा गंभीर दुष्काळी स्थितीचा सामना करण्याची वेळ जनतेवर आली होती. दुर्गाडीच्या दुष्काळासारखे १२-१२ वर्षे चालणारे दुष्काळ या देशानं पाहिले आहेत. आता एका वर्षाचा दुष्काळ चालू शकतो; परंतु सलग दोन-तीन वर्षाचा दुष्काळ संपूर्ण देशाला हादरवून सोडतो, अशी परिस्थिती पाहायला मिळते.

या पार्श्वभूमीवर दुष्काळी स्थितीवर मात करण्याच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या मुद्यांचा वेध घ्यायला हवा. याचं कारण या वर्षीही दुष्काळाचं सावट कायम राहणार असल्याचे संकेत आहेत. मागील वर्षी आपल्या हवामान खात्याने ९७ टक्के पावसाची आशा दाखवली होती; परंतु तो अंदाज फोल ठरला. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही आपल्या हवामान खात्याला पावसाचा अचूक अंदाज वर्तवण्यात अपयश येणं विचार करायला लावणारं आहे. त्यामुळेच आपल्या हवामान खात्याला अजूनपर्यंत देशात दुष्काळ पडणार आहे का नाही, हे समजू शकलेलं नाही. याउलट, परदेशातले शास्त्रज्ञ आणि अभ्यासकांना आपल्याकडल्या दुष्काळी स्थितीचं आकलन ताबडतोब होतं. त्या दृष्टीने परदेशी शास्त्रज्ञ तसेच अभ्यासकांनी याही वर्षी देशात दुष्काळी स्थिती कायम राहण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे परिस्थिती गंभीर होण्याचा धोका निर्माण झाला आहे. म्हणूनच याबाबत आतापासून नियोजनपूर्वक पावलं टाकण्याची गरज आहे.

काही जागतिक संस्थांनी आपल्या देशातील जनतेच्या राहणीमानाबाबत महत्त्वाची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार या देशातल्या २७ कोटी जनतेला केवळ एक वेळच्या अन्नावर अवलंबून राहावं लागतं. त्यांना दोन वेळचं धड अन्नही मिळत नाही.

म्हणजेच या देशात एवढ्या मोठ्या संख्येनं लोक अर्धपोटी राहतात. विशेष म्हणजे अन्य देशांशी तुलना करता हा आकडा बराच जास्त आहे. ‘ऑक्सफॅम फूड अव्हेलेबिलिटी इंडेक्स’च्या मतानुसार देशातल्या अर्धपोटी राहणा-या लोकसंख्येबाबत जगामध्ये भारताचं स्थान ९७ वं आहे. आणखी एक गंभीर बाब म्हणजे जागतिक पातळीवर २०१८ मध्ये सादर करण्यात आलेल्या उपासमारीच्या अहवालामध्ये आपल्या देशाचा क्रमांक १०३ वा आहे. या संबंधाने दुसरी आकडेवारीही खूप बोलकी आहे. आपल्याकडे १९९१ मध्ये प्रत्येक माणसाला १८६.२ किलो धान्य उपलब्ध होत होतं. ते २०१६ मध्ये १७७.५ किलोवर आलं. म्हणजेच प्रति माणशी उपलब्ध होणा-या अन्नधान्याच्या प्रमाणात घट झाली. शेजारच्या बांगलादेशमध्ये प्रत्येक व्यक्तीला २०० किलो धान्य उपलब्ध असतं. चीनमध्ये हे प्रमाण माणशी ४५० किलो, तर अमेरिकेत ११०० किलोपेक्षा जास्त होतं. याचा विचार करता देशांतर्गत अन्नधान्य उत्पादनवाढीबाबत आपण कितीही बढाया मारल्या तरी अन्नधान्य उत्पादनामध्ये आपण अजूनही स्वयंपूर्ण झालेलो नाही, हे स्पष्ट होतं. असं असताना सलग दुस-या वर्षी दुष्काळाची भर पडली, तर काय होईल, याचा अंदाज बांधणं कठीण आहे.

अशा परिस्थितीत हवामान खात्याच्या अनधिकृत आकडेवारीप्रमाणे देशात याही वर्षी ९६ टक्के पाऊस पडेल असं दिसतं. मागील वर्षी ९७ टक्के पावसाचं भाकीत होऊन आणि अनेक ठिकाणी सरासरीएवढा पाऊस होऊनही आज तीव्र दुष्काळी स्थितीला तोंड द्यावं लागत आहे. असं असेल तर या वर्षी ९६ टक्के पाऊस झाल्यास दुष्काळी स्थितीचा सामना करावा लागणार हे उघड आहे. याबाबत हवामान खातं भाष्य करायला तयार नाही; परंतु परदेशी तज्ज्ञांच्या मतानुसार मागील वर्षाच्या तुलनेत कमी पाऊस पडून यंदा देशात तीव्र दुष्काळ पडण्याची शक्यता वर्तवली गेली आहे.

साहजिक या दुष्काळाचं आव्हान पेलायचा विचार करणं आवश्यक ठरणार आहे. दुष्काळी स्थितीत पिण्याच्या पाण्याची तसंच जनावरांच्या चा-याची टंचाई निर्माण होते. त्याचबरोबर मुख्यत्वे दुष्काळी भागातल्या शेतमालाच्या उत्पादनावर विपरित परिणाम होतो. हे उत्पादन घटल्यानं संबंधित शेतमालाचं एकूणच देशांतर्गत उत्पादन घटतं. अशा स्थितीत जनतेची गरज पूर्ण करण्यासाठी संबंधित अन्नधान्याची आयात केली जाते; परंतु सातत्यानं दुष्काळी स्थिती निर्माण होत असेल तर हा मार्ग उचित ठरत नाही.

यामुळे एक तर देशाच्या एकूण आयातीवरील खर्च वाढतो आणि आयात-निर्यातीतली तूट वाढून अर्थव्यवस्था अडचणीत येते. शिवाय आयात अन्नधान्य जनतेला किफायतशीर दरात उपलब्ध करून देणं हेसुद्धा आव्हान ठरतं. त्या दृष्टीने काही पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागणार आहे.

आपल्याकडे आजही केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये डिझास्टर मॅनेजमेंट अर्थात आपत्ती निवारणाचं इतर देशात असतं तसं स्वतंत्र खातं अस्तित्वात नाही. इतर देश नसगक आपत्तीच्या वेळी किंवा या संकटाला तोंड देण्यासाठी पूर्वनियोजन करतात. आपल्याकडे स्वातंत्र्यानंतर आजवर तसे प्रयत्न केल्याचं दिसत नाही. आपलं याबाबतचं धोरण तहान लागल्यावर विहीर खणण्यासारखं असतं. शिवाय केंद्रात कोणतंही सरकार सत्तेत आलं तरी दुष्काळी स्थितीबाबत चाकोरीतीलेच उपाय योजले जात आहेत आणि यापुढेही योजले जाणार आहेत. ते म्हणजे गावोगावी टँकरने पाणीपुरवठा आणि चारा छावण्या निर्माण करणं. मात्र, या दोन्ही उपाययोजना प्रभावी ठरत नाहीत, हे वेळोवेळी दिसून आलं आहे. आता लवकरच केंद्रात नवं सरकार सत्तारूढ होईल. त्या सरकारने दुष्काळी स्थितीवरील उपाययोजनांकडे प्राधान्यानं लक्ष देणं गरजेचं आहे. अन्यथा, दुष्काळ अधिक तीव्र स्वरूप धारण करेल आणि जनतेला असह्य यातना सहन कराव्या लागतील. या परिस्थितीमध्ये सरकारनं आपल्या पातळीवर काही उपाययोजना केल्या तरी शेतक-यांनाही आपापल्या पातळीवर काही उपाययोजना करता येण्यासारख्या आहेत. त्यात छतावर पडणारं वा शेतातलं वाया जाणारं पावसाचं पाणी अडवून जमिनीत मुरवण्यावर भर द्यायला हवा. कूपनलिकांच्या पुनर्भरणाकडेही लक्ष द्यायला हवं. त्याद्वारे पाण्याची साठवण आणि बचत करता येईल. दुष्काळी स्थितीत जनावरांच्या चा-याची व्यवस्था व्हावी म्हणून हायड्रोफॉनिक्स पद्धतीने चा-याचं सुलभतेनं उत्पादन घेता येण्यासारखं आहे. ही पद्धत गावोगावी आणि घरोघरी राबवावी लागणार आहे. थोडा-फार पाऊस झाला तर डेंगरावर गवत उगवता येईल. पाणीबचत आणि पाण्याच्या काटेकोर वापराबाबत इस्त्रायलचा आदर्श घेण्यासारखा आहे. त्या देशात दर वर्षी सरासरी केवळ सहा इंच पाऊस पडतो. तरीही पाणीवापर आणि पाणीवाटपाच्या काटेकोर नियोजनामुळे त्या देशातल्या जनतेला दुष्काळाची झळ पोहोचत नाही. तशा पद्धतीचं नियोजन आपल्या देशात केलं जाणं ही आता काळाची गरज आहे. यापुढील काळात उसासारखी अधिक पाण्यावरील पिकं घेणं परवडणारं नाही. त्याऐवजी भरड धान्यांच्या उत्पादनावर भर द्यावा लागणार आहे. त्यामध्ये नाचणी, बाजरी, तूर, हुलगा, उडीद आदी पिकांचा समावेश होतो. याशिवाय एक-दोन पावसात येणारं वाटाण्यासारखं पिकही घेता येण्यासारखं आहे. मुख्यत्वे ही पिकं हलक्या जमिनीत घेता येतात. वाटाणा हे तर केवळ ६० दिवसांत येणारं, कमी खर्चाचं आणि चांगला दर मिळवून देणारं पीक आहे. अशा पद्धतीनं अल्पकाळातली पिकं शेतक-यांसाठी आधार ठरणार आहेत. या सा-या बाबींचा सरकारी पातळीवर तसंच कृषी खातं, कृषी विद्यापीठं आणि शेतक-यांनी गांभीर्यानं विचार करायला हवा.

# घात घडवणारी बुरशी



कँडिडा ऑरिस ही बुरशी सध्या जगभरच्या संशोधकांची आणि डॉक्टरांची डोकेदुखी बनली आहे. कारण रुग्णालयांपासून कुठेही तिचा संसर्ग होऊ शकतो आणि अशा संसर्गानंतर ९० दिवसांच्या आत रुग्णाचा मृत्यू होतो. ही बुरशी कुठून आली हे संशोधकांना गेली १० वर्ष अथक परिश्रम करूनही शोधून काढता आलेलं नाही आणि तिच्यावरचं प्रभावी औषध किंवा लसही शोधली गेलेली नाही.

माणसाला होणारे अनेक आजार जीवाणू, विषाणू आणि बुरशी यांच्या संसर्गामुळे होतात. म्हणूनच हवेतून, पाण्यातून तसंच खाण्यातून होणारे संसर्ग अनेकदा त्रासदायक तर काही वेळा प्राणघातक ठरतात. लशी किंवा औषधं उपलब्ध असलेल्या आजारांना प्रतिबंध करता येतो. रुग्णांना आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करून काही काळ रुग्णालयात किंवा घरी विश्रांती घेऊन त्यातून बाहेर पडता येतं; परंतु एखाद्या नवीन जीवाणू, विषाणू किंवा बुरशीचा अचानक प्रादुर्भाव होतो त्यावेळी त्यावरची औषधं तयार होईपर्यंत हे आजार अक्षरश: हाहाकार माजवतात. स्वाईन फ्लूच्या वेळी आपल्या देशानं याचा मोठाच गंभीर अनुभव घेतला होता. याच प्रकारे सध्या एका बुरशीनं थैमान घातलं आहे. तिचं नाव आहे. कँडिडा ऑरिस. या बुरशीच्या संसर्गावर कोणतंही औषध नसल्यामुळे जगभर भीतीही पसरली आहे.

नुकतीच न्यूयॉर्क टाइम्सनं या संदर्भातली माहिती प्रसिद्ध केली आहे. अलीकडेच ब्रुकलीन इथल्या माऊंट सिनाई हॉस्पिटल फॉर ॲब्डॉमिनल सर्जरीमध्ये एका वृद्धाला दाखल करण्यात आलं होतं. रक्ताची तपासणी करण्यात आल्यानंतर स्पष्ट झालं की त्याला एका नवीन प्राणघातक प्रकारच्या गूढ बुरशीचा संसर्ग झाला होता. डॉक्टरांनी ताबडतोब इतर रुग्णांपासून वेगळ्या कक्षात नेऊन त्याच्यावर वेगवेगळे उपचार केले; परंतु ते सगळे प्रयोगात्मक स्वरूपाचे होते आणि त्यांच्यापैकी कोणत्याही उपचाराला यश न आल्यामुळे हा वृद्ध तीन महिन्यांमध्येच मृत्यू पावला. त्यानंतर या बुरशीच्या संसर्गाकडे दक्षतेनं लक्ष पुरवण्यात आलं आणि अमेरिकेत कँडिडा ऑरिसच्या संसर्गाचे सुमारे ५८७ रुग्ण आढळले. अमेरिकेनं जाहीर केलेल्या ५८७ रुग्णांपैकी ३०९ रुग्ण न्यूयॉर्कमध्ये, १०४ न्यू जर्सीत आणि १४४ इल्लिनॉईऊसमध्ये आढळल्याचं म्हटलं आहे. मात्र अशा संसर्गाची नोंद अलीकडची नाही. जवळजवळ १० वर्ष त्यांची नोंद होत आली आहे. फक्त ती थोड्या प्रमाणात होती, आता हे प्रमाण लक्षणीय आहे.गेल्या पाच वर्षांमध्ये व्हेनेझुएलातल्या नवजात अर्भकांच्या विभागाला या बुरशीचा तडाखा बसला असून स्पेनमध्येही असाच प्रकार आढळला आहे. याखेरीज ब्रिटिश मेडिकल सेंटर या प्रतिष्ठित मानल्या जाणा-या वैद्यकीय केंद्राला आपली इन्टेन्सिव्ह केअर युनिटची सेवा या बुरशीमुळे काही काळ बंद ठेवावी लागली आहे. यानंतर भारत, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका या देशांमध्ये या बुरशीचं अस्तित्व दिसून आलं. सध्या न्यूयॉर्क, न्यू जर्सी आणि इल्लिनॉईस इथे या बुरशीचं थैमान सुरू आहे. यामुळे या बुरशीला ङ्गतातडीचा धोकाफ या सदराखाली ठेवण्यात आलं आहे.

ही बुरशी पहिल्यांदा २००९ मध्ये जपानमध्ये एका रुग्णाच्या शरीरात आढळली. अलीकडच्या काळात विविध रुग्णालयांबरोबरच नर्सिंग होममध्येही ती आढळली आहे. भारतात २०११ पासूनच या बुरशीच्या संसर्गाचे रुग्ण आढळले आहेत. एम्स ट्रॉमा सेंटरच्या डॉक्टरांनी अलीकडेच रुग्णांच्या प्रोफाईलचा अभ्यास केला. त्यातून या बुरशीच्या संदर्भातली धक्कादायक माहिती त्यांच्या हाती आली. २०१२ ते २०१७ या कालावधीत दाखल करण्यात आलेल्या दर दहा रुग्णांमध्ये दोन रुग्ण या बुरशीच्या संसर्गानं प्रभावित झालेले होते. याचा अर्थ वीस टक्के रुग्णांना या बुरशीचा संसर्ग झाला होता. सहसा इतर रोगकारक जीवजंतू रुग्णालयात वाढणं कठीण असतं; परंतु ही बुरशी रुग्णालयाच्या वातावरणात उत्तम प्रकारे वाढते हे तिचं वैशिष्ट्य आहे आणि रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्यांना ती सहजगत्या संसर्ग करते. भारतात २०११ मध्ये या देशातल्या वैद्यकीय आणि शल्यचिकित्साविषयक अतिदक्षता केंद्रांमध्ये या बुरशीचा मोठा अभ्यास करण्यात आला होता. चंडीगडच्या द पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च सेंटरनं या अभ्यासात समन्वयकाची भूमिका बजावली होती. या संशोधनाचा अहवाल २०१४ मध्ये प्रसिद्ध झाला.

या अहवालातून असं स्पष्ट झालं की, २००१ च्या एप्रिलपासून २०१२ च्या सप्टेंबरपर्यंत रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांपैकी ६.५१ टक्के रुग्णांना कँडिडा ऑरिसचा संसर्ग झाला होता. संसर्ग झालेल्या रुग्णांपैकी ४५ टक्के रुग्णांचा मृत्यू झाला. त्यांना कोणत्याही उपचारांनी वाचवणं शक्य झालं नव्हतं. भारत आणि अमेरिकेबरोबर इतर २० देशांमध्ये या बुरशीचा प्रादुर्भाव झाला आहे. अगदी व्हेनेझुएलापासून स्पेन, पाकिस्तानपर्यंत तिचा संसर्ग झाल्याचं आढळतं. या बुरशीच्या संसर्गाचं निदान करण्यासाठी खास प्रयोगशाळांची गरज असते आणि अनेक विकसनशील देशांमध्ये अशा प्रयोगशाळा नाहीत ही यातली सर्वात धोकादायक बाब आहे. या बुरशीचा संसर्ग झाला की त्या रुग्णालयातून किंवा सुविधेमधून तिचा नायनाट करणं ही जवळजवळ अशक्यप्राय गोष्ट असते. ही बुरशी एकदा रक्तप्रवाहात शिरली की प्राणघातक संसर्ग करते आणि रुग्णाच्या मृत्यूनंतरही जिवंत राहते. रुग्ण मरण पावल्यानंतरही त्याच्याच शरीरात नव्हे; तर त्याला ठेवण्यात आलेल्या संपूर्ण जागेत ती झपाट्यानं पसरल्याचं आढळतं. रुग्णाचे कपडे, वस्तू याबरोबरच खिडक्या, दरवाजे आणि काही ठिकाणी तर भिंती आणि छतावरही ती वाढल्याचं आढळतं. याआधी अशा परिस्थितीत काही रुग्णालयांना खास स्वच्छतासाधनांचा वापर करावा लागला आहे आणि काही रुग्णालयांना तर जमिनी आणि छतंही काढून टाकून नव्यानं तयार करावी लागली आहेत!

# विशाखापट्टणम येथे मिळते शौकिनांसाठी सोन्याची बिर्याणी

बिर्याणीवर आहे २३ कॅरट सोन्याचा वख वशाखापट्टणम येथील अतिथी देवो भवफ या रेस्टॉरंटमध्ये सोन्याची बिर्याणी मिळते. म्हणजे दोन किलोच्या मांसाहारी बिर्याणीवर २३ कॅरट सोन्याचा वर्ख लावलेला असतो. विशाखापट्टणम येथील रहिवाशांचे बिर्याणीप्रेम जगजाहीर आहे. पारंपरिक बिर्याणीसह चुलीवर शिजवलेली बिर्याणी, खेकडा आणि प्रॉन्सची एकत्रित बिर्याणी, अशा बिर्याणीच्या चित्रविचित्र प्रकारांवर येथील नागरिक ताव मारत असतात.शहरात बिर्याणीसाठी खास प्रसिद्ध असलेली निरनिराळी रेस्टॉरंट्सही आहेत. येथील अतिथी देवो भवफया रेस्टॉरंटने मात्र सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. कारण या रेस्टॉरंटमध्ये रुपेरी रंगाच्या डिशमध्ये सोन्याची बिर्याणी ग्राहकांसमोर पेश केली जाते.सोन्याची बिर्याणी हे वाचून तुमचा विश्वास बसणार नाही. पण, खरेचच या रेस्टॉरंटमध्ये बिर्याणीला २३ कॅरट सोन्याची सजावट केलेली असते.

या बिर्याणीची किंमत आहे १५०० रुपये. दोन किलो मांसाहारी बिर्याणीवर सोन्याचा वर्ख लावलेला असतो आणि त्यासमवेत दम चिकनचे दोन तुकडे, बोनलेस चिकन फ्राय आणि फ्राइड अंडी दिली जातात. दुबईतील एका रेस्टॉरंटच्या मेन्यूमध्ये सोन्याच्या बिर्याणीचा समावेश केलेला आहे. त्या रेस्टॉरंटकडून अतिथी देवो भवफने प्रेरणा घेतली आहे. दुबईतील ही बिर्याणी जगातील सर्वाधिक महागडी बिर्याणी समजली जाते. दुबईत मिळणाऱ्या त्या बिर्याणीची चव आम्हाला येथे आमच्या बिर्याणीला आणायची होती. ही बिर्याणी तयार करण्यासाठी २० मिनिटे लागतात.त्यामुळे आम्ही किमान एक दिवस तरी आगाऊ नोंदणी घेतो,फ अशी माहिती अतिथी देवो भवफचे मालक व्ही. राजशेखर रेड्डी यांनी दिली.रेड्डी यांच्या पत्नी के. भाग्यरेखा सिन्हा दुबईत गेल्या असताना त्यांनी तेथील सोन्याच्या बिर्याणीची चव चाखली आणि अशीच बिर्याणी आपल्या रेस्टॉरंटमध्ये बनवावी, असे त्यांच्या मनात आले. मात्र,



ती खास चव येण्यासाठी बराच काळ जावा लागला. खाण्यासाठी असलेले सोने फॉइल, कण किंवा चुऱ्याच्या स्वरूपात येते. ते खाण्यायोग्य आहे, यासाठी प्रमाणपत्रही लागते. मुंबईतील एका व्यापाऱ्याकडून आम्हाला सोन्याचा वर्ख मिळाला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवसाई युनिव्हर्सल येथे रंगला स्वातंत्र्य दिवस व श्रीकृष्ण जन्माष्टमी चा थरार.

## शिवसाईची दहीहंडी सर्व धर्म समभाव व एकतेचा प्रतीक देणारी.. डी एस लहाने...

**जनसंचलन/बुलडाणा**

गोविंदा रे गोपाला या जयघोषामध्ये शिवसाई ज्ञानपीठ युनिव्हर्सल ज्ञानपीठ अजिंठा रोड स्कुल चे प्रांगण दुमदुमून निघाले होते. दरवर्षी प्रमाणे यंदाही शिवसाईच्या विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाच्या वेशभूषा परिधान करून विविध देखावे सादर करण्यात आले होते. सकाळपासूनच भर पावसामध्ये देखील विद्यार्थ्यांमध्ये गोपाळकाला व दहीहंडीचा उत्साह संचारला होता. पालकांनी आपल्या पाल्यांची खूप छान प्रकारे राधा व कृष्णाची वेशभूषेमध्ये तयार करून मोठ्या आनंदाने शाळेत घेऊन आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी डी.एस. लहाने शिवसेना सहसंपर्क प्रमुख बुलढाणा बुलढाणा जिल्हा यांनी भूषविले तर प्रमून पाहुण्या म्हणून सौ. मीनाताई लहाने संचालिका शिवसाई नागरी सहकारी, पतसंस्था व शिवसाई युनिव्हर्सल ज्यु. कॉलेज चे प्राचार्य. डॉ.एस.डी. दाभाडकर तथा महिला मुस्लिम पालक अलफिया नाज सय्यद साजिद व बरेचसे मुस्लिम बांधव व विद्यार्थी जसे शेख सरताज व इतर अनेकांनी गोपाळकाला कार्यक्रम मधे उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली प्रास्ताविक भाषणमधे शिवसाईचे शाळेचे प्राचार्य प्रमोद मोहरकर यांनी एकतेचा संदेश दिला. त्याच प्रमाणे आपण सर्वांनी इतरांच्या धर्माचा आदर करावा व आपण सुशिक्षित असून योग्य व अयोग्य यांची व्यवस्थित चाळण करावी असे प्रतिपादन केले. व खुप मोठ्या बलिदानाने मिळालेल्या स्वातंत्र्याचा प्रत्येकाने आदर राखायलाच हवा. भगवान श्री कृष्णाचे बाल सवंगडी जसे सुख दुःखांमध्ये सहभागी होत त्याच प्रमाणे शिवसाई परिवार एकतेचा नारा देत दहीहंडीचा उत्साह वाढवत थरावर थर उभारत होते त्यामध्ये मुली देखील मागे नव्हत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डी.एस. लहाने यांनी सर्वप्रथम बोलत असतांना गोकुळामध्ये गोपाळकाला मोठ्या उत्सहात साजरा केला जातो हे सांगितले तसेच भगवान श्री कृष्ण आपल्या सवंगड्याच्या सुख दुखात नेहमीच सहभागी होत असत याचा दाखला देत आपण सर्वांनी आपले नातेवाईक तसेच शेजारच्यांशी हित संबध जोपासून सुख-दुःखामध्ये सहभागी व्हावे असे प्रतिपादन केले. कार्यक्रम प्रसंगी शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल येथील वर्ग नर्सरी, ज्युनियर केजी, सिनिअर केजी व वर्ग एक ते बारावीचे विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा करत, नृत्य, गाणे, नाटिका सदर करून तसेच शेतकरी राजा यावर देखावे साजरे करून उपस्थित पालकांची वाहवा मिळविली व नंतर वर्ग ५ वी ते १० वी च्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मटकी फोडून दहीहंडी उत्सव हर्ष व उल्हासात साजरा केला व् सर्व उपस्थितांना गोपालकाल्याचा



प्रसाद वाटप करण्यात आला, वरूण राजाचे आगमन शेतकरी राजाला सुखावणारे असल्याने हि दहीहंडी शेतकरी राजाला समर्पित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी उबरहंडे, दिया बारवाल, समृद्धी पवार वेदिका माळोदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशश्वितेसाठी. अर्चना हिवाळे, सुरेखा रामाने, ज्ञानेश्वर मोहरकर, गोपाल आडवे व सर्व शिक्षक व शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी अशा खूप छान प्रकारे कार्यक्रमाची सजावट केली व कार्यक्रम यशस्वी केला.तथा शिवसाई पतसंस्थेच्या कर्मचारी वृंदांची उपस्थिती प्रार्थनीय होती.

---

# सहकार विद्या मंदिर मध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा...

**जनसंचलन/बुलडाणा**

स्थानिक सहकार विद्या मंदिर येथे बुलडाणा अर्बन चॅरिटेबल संस्थेतर्फे आयोजित स्वंतत्रता दिवस अत्यंत उत्साहात साजरा केला. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय श्री. राधेश्यामजी चांडक, अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर, बुलडाणा अर्बन चॅरीटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर, श्री.मनिषजी कासट तसेच संचालक श्री.गोपालजी चिराणीया, श्री.जयसिंहजी जयवार हे उपस्थित होते. बुलढाणा शहरात सहकार विद्या मंदिर सी.बी.एस.ई व स्टेट बोर्ड च्या विद्याथ्र्यांनी तिरंगा प्रभातफेरी काढुन संपुर्ण शहर तिरंगामय केले. रॅलीची सुरवात बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय भाईजी यांच्या शुभहस्ते झाली. याप्रसंगी वर्ग ४ थीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट सादर करीत उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. उत्तराखंड येथील नुकत्याच घडलेल्या नैसर्गिक त्रासदीचा उल्लेख करीत या घटनांना मानव कारणीभुत आहे. त्याने वेळीच सावध होऊन वसुधंरेचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचा संदेश विद्यार्थ्यांनी उपस्थित जनसमुदायाला दिला. या रॅलीचे आकर्षण ठरले ते वर्ग १ ते ३ चे बॅण्ड पथक.... कदम कदम बढाए जा या धुनवर विद्यार्थ्यांनी अप्रतिम सादरीकरण केले. त्यावेळेस उपस्थित सर्व नागरिक अचंबित झाले. सदर रॅलीची सांगता जिजामाता प्रेक्षागार येथे वंदे मातरम ने झाली. यावेळेस मोठा संख्येने पालक रॅली मध्ये सहभागी झाले होते. शाळेमध्ये कार्यक्रमाची सुरवात ध्वजवंदनाने झाली व दिपप्रज्वलनानंतर ऑपरेशन सिंदुर यावर आधारीत नृत्य सादर करीत विद्यार्थ्यांनी शहिदांना श्रध्दांजली अर्पण केली. याप्रसंगी बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. सुकेशजी यांनी विद्यार्थ्यांना अत्याधिक टेक्नॉलॉजीच्या आहारी न जाता स्वबळावर यश प्राप्त करण्याचे आवाहन केले. तंत्रज्ञानाचा अतिवापर हा भविष्यामध्ये मानव जीवन पध्दतीला बाधक ठरणार आहे तरी वेळीच आपण सावध होवून आपली उच्च जीवनमुल्ये व संस्कृतीचे रक्षण करण्याचे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. याप्रसंगी बोलताना मा. भाईजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शाळेचा निकाल १०० % लागल्याचे सांगत सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लवकरच सुसज्ज व अत्याधुनिक




सोयीयुक्त इनडोअर स्टेडीयमचे काम सुरु असल्याचे आपल्या भाषणातून सांगितले. . यानंतर यावर्षी शाळेच्या १० वी (सी.बी. एस.ई.) व १० वी व १२ वी (स्टेट बोर्ड) परिक्षेत उत्कृष्ट गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मा. अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. चि.पार्थ तायडे व चि. त्रिलोकेश भवटे या दोन विद्यार्थ्यांचा डॉ. होमी भाभा व एम.टी.एस.सी. परीक्षेतील यशाबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांसह मोठा संख्येने पालक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. विशाल देशमुख व श्री.दिपक वाघ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, व सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी वर्गाने अथक परिश्रम घेतले.

---

# पालकमंत्री मकरंद पाटील यांची तुकाराम अंभोरे पाटील यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट...



**जनसंचलन/बुलढाणा**

पालकमंत्री मकरंद आबा पाटील हे (दि.१५) ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी ध्वजारोहण निमित्ताने बुलढाणा येथे आले, असता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तुकाराम अभोरे पाटील यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटी दरम्यान भारतीय जनता पक्ष चिखलीच्या आमदार श्वेताताई महाले पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष नाझेर काझी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तुकाराम अंभोरे पाटील, खामगावचे माजी आमदार दिलीप कुमार सानंदा, माजी आमदार वसंतराव शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे व भाजपाचे जिल्ह्यातील विविध पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी एकत्रपणे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात विस्तृत चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील सार्वजनिक विकास कामे, अतिवृष्टीसाठी लागणारी मदत, कमी पाऊस झाल्यास करावयाच्या उपायोजना यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली. जिल्हाभरातून आलेले कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी अंभोरे पाटील यांच्या घरी एकच गर्दी केले होती. पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांनी कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांच्या समस्या, अडीअडचणी समजून घेत जागेवरच संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनी द्वारे कामे करण्याचे आदेश दिले. तसेच दर पंधरवड्याला मी बुलढाणा जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात येणार आहे. शेतकऱ्यांसह जनतेच्या अडीअडचणी प्रश्न समस्या समजून घेईल व ते सोडवण्याचा आटोकाट प्रयत्न करेल, असे मत कार्यकर्त्यांशी बोलताना व्यक्त केले.

# अस्वलाने एखाद्याचा बळी घेतल्यानंतर वन विभागाला जाग येईल का?

**जनसंचलन/ डोंगरशेवली**

श्रावण महिना सुरू असल्याने गाव शिवारातील सोमनाथ मंदिरात भाविकांची वर्दळ असते,मात्र येथे अस्वलांचा मुक्त संचार सुरु आहे. त्यामुळे या परिसरातील शेतीत कष्ट करून दोन पैसे कमावणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना अस्वलाच्या भयामुळे जीव मुठीत घेऊन काम करावे लागत आहे. दाट झाडीत दडून बसलेला किंवा मुक्त वावरत असलेले अस्वल कधी काय करेल याचा नेम नाही, याबाबत वन विभागाला तक्रार करूनही अस्वलाच्या बंदोबस्ताकडे वन विभाग दुर्लक्षित असून,एखाद्याचा बळी गेल्यावरच वनविभाग उपायोजना करणार काय? असा



प्रश्न विचारला जात आहे. डोंगरशेवली गाव शिवारातील सोमनाथ मंदिरात दोन अस्वलाचा वावर असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. दरम्यान वन विभागाने अस्वलाचा बंदोबस्त करावा, अशी नागरिकांची मागणी करण्यात आली आहे. डोंगरशेवली गावाला लागूनच जंगल परिसर आहे. या परिसरात बऱ्याचदा अनेक हिस्त्र प्राण्यांचा वावर पाहायला मिळतो.

दोन अस्वल दोन दिवसापूर्वी गाव परिसरात असलेल्या श्री सोमनाथ महाराज मंदिरात आढळून आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सध्या शेतातील पिकांची मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु आहे. अशातच अस्वलाचा मुक्त संचार पाहता शेतकरी व शेतमजूर भयभीत झाले आहेत. अनेक वेळा वन विभागाकडे डोंगर शेवली येथील ग्रामस्थांनी तक्रारी, निवेदन दिले. मात्र या निवेदनाची अद्याप पर्यंत वन विभागाने दखल घेतली नसल्याचे दिसून येत आहे.वन विभागाने तात्काळ उपयोजना कराव्यात,अशी मागणी जोर धरु लागली आहे.

# निसर्गाने पांघरली बुलढाण्यावर धुक्याची चादर!

**जनसंचलन/बुलढाणा**



नसर्गात सातत्याने बदल होत आहे. कुठे पाऊस तर कुठे ढगाळ वातावरण दिसत असताना, अशात हिरवा शालू नेसलेल्या बुलढाण्याने आज पहाटे धुक्याची चादर ओढून घेतल्याने हे दृश्य निसर्गप्रेमींनी डोळ्यात स्थिरावून ठेवले होते.सकाळी नऊ वाजेपर्यंत ही हिल स्टेशन बुलढाण्याची अनुभूती अनेकांनी घेतली. बुलढाणा जिल्ह्यात पावसाने २ -३ दिवसाआधी थैमान घातले. अद्याप देखील ढग मांडव घालून आहे. त्यामुळे वातावरणाचा शेती पिकांवर मोठा परिणाम होतांना दिसत आहे. शिवाय शेतकरी चिंतेत आहेत. आज जिल्ह्यात सर्वत्र दाट धुक्याची चादर पसरली आहे. या धुक्यामुळे पिकांवर रोगराई पसरण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.आज सकाळी जिल्ह्यात सर्वत्र दाट धूक्याची चादर बघायला मिळत आहे. दरम्यान निसर्गप्रेमींनी या दाट धुक्याची मनसोक्त अनुभूती घेतली आहे.

# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळांच्या वतीने स्वच्छता अभियान संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**




स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने श्रावण महिन्यात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येते मंडळाच्या माध्यमातून मागील २५ वर्षा पासून मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्नाभाऊ शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम अखंड निस्वार्थ पणे मुख मे हो राम नाम,राम सेवा हाथ मे हे ध्येय घेऊन अखंड पणे सुरू आहेत भारतीय संस्कृतीत धार्मिक स्थळांना केवळ आध्यात्मिक नव्हे तर सामाजिक दृष्या देखील अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे समाजाच्या सर्व स्तरातील लोक एकत्र येण्याची जागा म्हणजे मंदीर आध्यात्मिक अनुभव देणाऱ्या या पवित्र ठिकाणांची स्वच्छता असणे ही एक सुखद अनुभुती ठरते मंदीराचे महत्त्व ओळखून श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने दिं १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी परिसरातील ओंकारेश्वर मंदिर चिखली रोड. विठ्ठल मंदिर शिवाजी नगर.दत्त मंदीर येथे मंदीर व मंदीर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले व तसेच प्रत्येक घरात तुळस लावणे व तुळशी चे महत्त्व सांगण्यात आले पर्यावरण संवर्धन करीता तुळस ओळखली जाते तुळस ज्याला पवित्र तुळस म्हणून ही ओळखली जाते ही एक औषधी वनस्पती आहे जी अनेक आरोग्य दायी फायद्यासाठी ओळखली जाते धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या ही तुळशी ला खूप महत्त्व आहे तुळस अनेक रोगांवर गुणकारी आहे आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी तसेच वातावरण शूध्द ठेवण्यासाठी मदत करते तुळशीला संरात्मक आणि नशीब आणि समृद्धी आणणारी औषधी वनस्पती म्हणून ही पाहिले जाते म्हणून तुळस लावा पर्यावरण वाचवा असा संदेश सुध्दा या वेळी देण्यात आला अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

# क्रियाशील पेन्शनर्स असोसिएशन ची वार्षिक आमसभा संपन्न

**जनसंचलन/ खामगांव**

श्री अर्जुन खिमजी नॅशनल हायस्कूल च्या सभागृहात १७ ऑगस्ट २०२५ रोजी क्रियशील पेन्शनर्स असोसिएशन ची वार्षिक आम सभा संप्न्न झाली सभेच्या अध्यक्षस्थानी भानुदास रामकृष्ण हुरसाड हे होतें व तर प्रमुखअतिथी व सत्कार मुर्ती सेवानिवृत्त कोषागार अधिकारी बबन राव इटे साहेब. ज्येष्ठ पत्रकार मोहम्मद फारुक सर , वैद्यकीय अधिकारी डॉ कु. प्रेरणा अविनाश वाकोडे मंचावर विराजमान होते कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी संस्थेच्या दिवंगत आजीव सभासदांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पत करण्यात आली. त्यानंतर मंचावर विराजमान मान्यवरांचे गुलाब पुष्प देऊन स्वगत करण्यात आले श्री अर्जुन खिमजी नॅशनल हायस्कूल मधील ३३ गुणवंत विद्यार्थ्यांचे मेडल , प्रशस्तीपत्र व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आले नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश निवृत्ती खर्चे यांनी सादर केले. श्रीराम घाटे यांनी संस्थेच्या मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले त्यास सर्वमतीने या सभेत मंजुरी देण्यात आली त्यानंतर मंचावर विराजमान सेवानिवृत्त कोषागार अधिकारी बबनराव इटे ,




ज्येष्ठ पत्रकार मोहम्मद फारूक , वैद्यकीय अधिकारी मलकापूर डॉ कु प्रेरणा अविनाश वाकोडे या तीनही सत्कार मुर्ती यांचा परिचय करून शाल , पुष्पहार व स्मृतिचिन्ह (मोमेंटो) देऊन सत्कार करण्यात आले आपल्या अध्यक्षीय भाषणात भानुदास हुरसाड यांनी माहिती देवून कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ याच महिन्यात संपणार असल्यामुळे नवीन कार्यकारी मंडळा ची निवड सर्वानुमते करण्यात आली असून सहाय्यक धर्मदाय आयुक्त बुलढाणा या कार्यालयात मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल करण्याचे ठरविले आहे तसेच याच सभेमध्ये कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ ३ वर्ष ऐवजी ५ वर्ष करण्याचे ही ठरविण्यात आले. पुढे भुनुदास हुरसाड यांनी विविध शासन जी आर संबंधी माहितीही दिली. याप्रसंगी सत्कारमूर्ती यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नंतर पसायदान व राष्ट्रगीत ने वार्षिक आमसभा संपली असे जाहीर करण्यात आले त्यानंतर अल्पोपहार व चहापान श्रीमती गजभिये मैडम यांच्या सौजन्याने पार पडले - कार्यक्रमाचे संचालन सुरेश खर्चे यांनी केलेतर आभार प्रदर्शन रमेश चौहान यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निंबोळकर सर, चव्हाण साहेब, निखाडे सर , धोरण सर , वामन पाटील , भीमराव इंगळे , श्री घाटे , श्रीमती खुमकर मॅडम , कसूरकर सर इत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८